| | |
|---|---|
| MHKO070004772025 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.९०/२०२५</u>**<br>निलेश शामसुंदर जोशी<br>विरुध्द<br>पुष्पादेवी सुभाषचंद्र जोशी – मयत – तर्फे वारस<br>आणि इतर |

<u>निशाणी क्र.२३ खालील आदेश</u>

अर्ज वाचला. त्यावरील म्हणणे वाचले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

०२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करणेकामी दिलेला आहे. त्यांनी अर्जात नमुद केले आहे की, ते व्यापारी असुन संपुर्ण कुटूंबाची जबाबदारी असल्याने सदर प्रकरणी नेमले तारखेस ते हजर राहू शकले नाहीत. त्यांनी जाणीवपुर्वक निष्काळजीपणा केला नाही. दावा हा स्थावर मिळकतीचा आहे. त्यामुळे त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हा वाटप व मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रत्येक दावा हा गुणदोषावर निकाली निघणे हे अत्यंत आवश्यक आहे. प्रस्तुतचे प्रकरण गुणदोषावर निकाली काढण्याच्या उद्देशाने प्रतिवादी यांना एक संधी दिली तर त्याची मदत अंतिम न्यायनिर्णयासाठी होणार आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे उभयपक्षातील वादाचे संपूर्ण निराकरण करण्यासाठी व प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्याच्या उद्देशाने सदर प्रतिवादी यांना संधी देणे विधीसंगत वाटते. परंतु, संधी देताना त्यांनी घेतलेल्या वेळेच्या अनुषंगाने वादीस खर्च देणे देखील गरजेचे आहे. करिता खालील आदेश पारीत करण्यात येतो–

– **<u>आदेश</u>** –

१. प्रस्तुतचा अर्ज (निशाणी क्र.२३) हा प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी खर्च म्हणून वादी यांना र.रू.२००/– (र.रु.दोनशे फक्त) देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.२ व ३ यांचे विरुध्दचा झालेला ''एकतर्फा'' चा आदेश खर्चाची पुर्तता झाल्यास रद्द समजावा.

३. खर्चाची पुर्तता पुढील तारखेस किंवा तत्पुर्वी करावी.

४. दोन्ही पक्षांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE

Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2026.05.06 17:30:25 +0530

दि.०६/०५/२०२६ **(अ. त्रिं. मनगिरे)**

जयसिंगपूर. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),

जयसिंगपूर ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Sou. P. S. Musale |
| Name of Court | Jt.C.J.J.D.& J.M.F.C., Jaysingpur. |
| Date of Dictation. | 06/05/2026. |
| Judgment/order signed by the PO on | 06/05/2026. |
| Judgment/order uploaded on | 06/05/2026. |